॥ रिकामे मधुघट ॥

भा. रा. तांबे १९३३

मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं! ॥ धृ ॥

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विची स्मरोनी
करिं रोष न सखया, दया करी . ॥ १ ॥

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठीं;
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगीं अंगणीं कशी तरी . ॥ २ ॥

तरुण - तरुणिंचि सलज्ज कुजबुज,
वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं! ॥ ३ ॥

ढळला रे ढळला दिन सखया!
संध्याछाया भिवविति हृदया,
अता मधूचें नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरीं. ॥ ४ ॥